# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक ०६/०३/२०१७**

**सायं ४.३० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | **प्रश्नोत्तरे** | --- |
| २ | **शासकिय पत्रव्यवहार माहितीस्तव** | सदरचा विषय माहितीस्तव आहे. |
| ३ | **श्री.प्रकाश वसंत चव्हाण यांना लाड समिती शिफारशीनुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर समावून घेणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती सविता वसंत चव्हाण, सफाई कामगार या दिनांक ०२/०८/२०१६ रोजी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छासेवानिवृत्त झालेल्या असुन त्यांचा मुलगा श्री.प्रकाश वसंत चव्हाण (वय ३५ वर्षे) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक, दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय, दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसाहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४ | **सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या तीन वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेच्या मालकीची वाहने दुरूस्ती करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **प्रस्ताव / निर्णय** :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० ह्या तीन वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेच्या मालकिची वाहने दुरुस्ती करणेकामी पॅनलनुसार ई-निविदा मागविणेसाठी व त्याकामी होणाऱ्या ३०,००,०००/- पर्यंतच्या खर्चास व पुढील दोन वर्षाकरिता प्रती वर्षी १०% ने वाढ देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक वॉर्डात म्हणजेच प्रभाग समिती |

| | | |
|---|---|---|
| | | ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच, व आय या प्रभागांमध्ये निविदा भरण्याऱ्या व्यक्तिचे / कंपनीचे स्वत:चे गॅरेज असले पाहिजे या अटी शर्तीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच वाहन विभागाकडील वाहन दुरुस्ती करणाऱ्या मागील मंजूर निविदेस १ एप्रिल २०१७ पासून २ महिने मुदतवाढ देण्यास हि सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | **<u>सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या तीन वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडे तत्वावर मनुष्यबळासहीत यंत्र सामुग्री घेण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.</u>** | **<u>प्रस्ताव / निर्णय</u>** :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० ह्या तीन वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडे तत्वावर विविध प्रकारची जड वाहने व यंत्रसामुग्री मनुष्यबळासहित पुरवठा करणेकामी ई-निविदा मागविणेसाठी व त्याकामी होणाऱ्या अंदाजित सन २०१७-१८ या वर्षासाठी रुपये ४,००,००,०००/- २०१८-१९ या वर्षासाठी रक्कम रुपये ४,४०,००,०००/- व २०१९-२० या वर्षासाठी रक्कम रुपये ४,८४,००,०००/- रकमेच्या खर्चास तसेच वाहन विभागाकडील मागील मंजूर निविदेस नवीन सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० ची ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यास हि सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | **<u>स्मशानभुमी प्रेते दहनांकरीता जळावू लाकडे खरेदी करणेकामी ई -निविदा काढणेबाबत.</u>** | **<u>ठराव / निर्णय</u> :-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व स्मशानभूमीमध्ये प्रेते दहनासाठी आवश्यक असलेल्या जळाऊ लाकडे पुरविणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने सदर माहिती अभावी सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवावा व महापालिकेस सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात स्मशानभूमीतील प्रेते दहनाकरिता आवश्यक असलेली जळाऊ लाकडे फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, शिरसाड यांच्याकडून खरेदी करावी व सदर जळाऊ लाकडाच्या खरेदीची आगाऊ रक्कम व वाहतूक पासाची रक्कम फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, शिरसाड यांना अदा करणेस तसेच जळाऊ लाकडे स्मशानभूमीमध्ये पोहच करण्यासाठी मंजूर वाहन पुरवठा ठेकेदार यांना कार्यादेश देणेस व त्या अनुषंगाने वाहतूकीचे होणारे देयक अदा करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ७ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून सन २०१७-१८, २०१८-१९,२०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महिला मेळावे व इतर कार्यक्रमासाठी स्टेज मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम, व्हिडीओग्राफी, फोटोग्राफी इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली .वसई - विरार शहर महानगरपालिकेकडून सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महिला मेळावे व इतर कार्यक्रमासाठी स्टेज मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम, व्हिडीओग्राफी, फोटोग्राफी इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी प्रती वर्ष २ कोटी प्रमाणे तीन वर्षाकरिता एकूण ६ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी व तीन वर्षाकरिता पॅनल पध्दतीने ०९ प्रभाग समिती निहाय ई-निविदा दर मागविणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८ | **वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०१७-१८, २०१८-१९ ,२०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महानगरपालिका सभा तसेच इतर कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार चहापान, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार इ.व्यवस्था करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली .वसई - विरार शहर महानगरपालिका सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षात सार्वजनिक कार्यक्रम, शालेय क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महानगरपालिका सभा तसेच इतर कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार चहापान, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार इत्यादी व्यवस्था करणेकामी प्रती वर्ष १ कोटी प्रमाणे तीन वर्षाकरिता एकूण ३ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी व तीन वर्षाकरिता पॅनल पध्दतीने ०९ प्रभाग समिती निहाय ई-निविदा दर मागविणे ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (सुनील आचोळकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | **वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०१७-१८, २०१८-१९ ,२०१९-२० या वित्तीय वर्षासाठी स्टेशनरी छपाई खरेदी करून पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली .वसई - विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी स्टेशनरी छपाई खरेदी करुन पुरविणेकामी प्रती वर्ष १ कोटी ५० लक्ष प्रमाणे तीन वर्षाकरिता एकूण ४ कोटी ५० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी व तीन वर्षाकरिता स्पर्धात्मक ई-निविदा दर मागविणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १० | **वसई-विरार शहर महानगरपालिका सन २०१७-१८, २०१८-१९ ,२०१९-२० या वित्तीय वर्षासाठी किरकोळ स्टेशनरी खरेदी करून पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली . वसई - विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१७-१८,२०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी किरकोळ स्टेशनरी खरेदी करुन पुरविणेकामी प्रती वर्ष १ कोटी प्रमाणे तीन वर्षाकरिता एकूण ३ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी व तीन वर्षाकरिता स्पर्धात्मक<br>ई-निविदा दर मागविणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११ | **प्रभाग समिती "एफ" धानिव पेल्हार क्षेत्रातील नालसोपारा फाटा ते संतोष भवन खिंडपर्यंत रस्ता खडीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-** सदरच्या कामी येणा-या रू.५,९६,४८,४७६/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी सिलबंद निविदा दर मागविण्यात यावे असे हि सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू.व डायलेसीस सेंटर यासाठी आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने, वैद्यकीय आरोग्य विभाग, आय.सी.यू. व डायलेसीस सेंटर यासाठी आवश्यक असलेले अधिकारी/ कर्मचारी वर्ग तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार आयुक्त यांस मा.सर्वसाधारण सभेच्या पुर्ण मंजूरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक ६ महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही. आणि कोणत्याही नेमणूकीचे ऊक्त ६ महिन्यांच्या कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही अशी तरतुद आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागात यापुर्वी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाची ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीची सेवा दि. ०८/०३/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने वैद्यकीय आरोग्य विभागातील वरील प्रस्तावात नमुद अधिकारी/कर्मचारी वर्गाची आवश्यकता तसेच विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता सर्व पदांच्या नेमणूका १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुलाखतीची प्रक्रिया न करता यापुढे ३ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने पुढे चालू ठेवणेस |

| | | |
|---|---|---|
| | | व यापुढील सहा महिन्याच्या तात्पुरत्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करणेकामी वर्तमानपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करुन पुढील प्रक्रिया करणेंस ही सभा मंजूरी देत असून याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (भारती देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०१७-१८, २०१८-१९,२०१९-२० या त्रैवार्षिक करिता आवश्यकतेप्रमाणे औषधे, उपकरणे, रुग्णालयीन साहित्य , साथ प्रतिबंधक लस, लस टोचणी साहित्य, यंत्रे व कापड प्रकार प्रकार खरेदी तसेच ऑक्सिजन सिलेंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता मंजुर असलेल्या सर्व ई-निविदांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.** | वसई विरार **ठराव / निर्णय** :- शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०१७-२०१८,२०१८-२०१९ व २०१९-२०२० या त्रैवार्षिक करिता दराच्या ई निविदा मागविणेकामी आवश्यक प्रक्रिया करुन संविदा करणेकामी व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरिता मंजुर असलेल्या सर्व ई-निविदांना नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देऊन पुढील कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४ | **नानभाट जनहित सोसायटी, नानभाट या संस्थेस अनुदान मंजूर करणेबाबत.** | **निर्णय** :- महानगरपालिकेकडुन अनुदान मिळण्यासाठी आता पर्यंत अनेक संस्थांमार्फत महानगरपालिकेकडे मागण्या आलेल्या आहेत. सदर बाबीचा विचार करता उपरोक्त, नानभाट जनहित सोसायटी, नानभाट या संस्थेचा अनुदान मंजुरीचा प्रस्ताव, तुर्तास तहकुब ठेवावा अशी आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (अजीत नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १५ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर १ पद, उद्यान अधिक्षक १ पद, सहाय्यक उद्यान अधिक्षक १ पदे, प्रमुख माळी - ३ पदे या पदांवर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ठोक वेतनावर नियुक्त केलल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** संगणक विभाग व उद्यान विभागातील कामाची निकड पाहता ठोक वेतनावरील १) हर्षल रघुनाथ पाटिल, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर), २) प्रशांत रमेश पाटिल, उद्यान अधिक्षक, ३) ओमकार राजन नार्वेकर, सहाय्यक उद्यान अधिक्षक ४) मयुरकुमार राजन सावळे, सहाय्यक उद्यान अधिक्षक, ५) अजय जगन्नाथ भोईर, प्रमुख माळी, ६) दौलत अमत गोतारणे, प्रमुख माळी, ७) प्रतिक समाधान गाढे, प्रमुख माळी या सात कर्मचाऱ्यांना उद्यान व संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता सदर ठोक वेतनावर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना दि. ३१ मार्च, २०१७ पर्यंत किंवा या पदावर अभिकर्त्यामार्फत ठेका कर्मचारी नेमणूक होईपर्यंत सहा महिन्याचे मर्यादेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास, तसेच ठोक वेतनावरील खर्चास आजची ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर खर्च महानगरपालिकेच्या "वृक्षारोपण/उद्यान मजूर देखभाल" व "सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स)" या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा<br>**अनुमोदक :- (प्रकाश रॉड्रीक्स) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १६ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी टेबल, खुर्च्या, कपाट, रॅक व इतर फर्निचर खरेदी करून पुरवठा करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-** सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली . वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या तीन वित्तीय वर्षासाठी टेबल, खुर्च्या, कपाट, रॅक व इतर फर्निचर खरेदी करुन पुरवठा करणेकामी प्रती वर्ष ४५ लक्ष प्रमाणे तीन वर्षाकरिता एकूण १ कोटी ३५ लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेस व तसेच तीन वर्षाकरिता पॅनल पध्दतीने मुख्यालयातून ०९ प्रभाग समिती निहाय स्पर्धात्मक ई-निविदा दर मागविणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १७ | **तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकामी स्थानिक प्राधिकरणानी नियुक्त केलेल्या दोन सदस्यांच्या नावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय-**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेंत आली. तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकामी स्थानिक प्राधिकरणामार्फत दोन सदस्य नेमणूक करण्यांचे सर्वाधिकार मा.महापौर यांना देण्यांत येत आहेत असे आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |